# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## दैनंदिन गुन्हे - दिनांक १७/०४/२०२३

➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र.१७१/२३ कलम ३२५, ३२६, ५०६ भादवी | कॉटन मार्केट भाजी मंडी जेफसी फ्रुट दुकान नं. ८६ अमरावती | दि.१४/०४/२३ चे १६/३० वा<br><br>दि. १६/०४/२३ चे १४/५९ वा | अब्दुल मजीद अब्दुल बशीर वय ६७ वर्ष व्यवसाय-भाजीविक्री रा. जाकीर कॉलनी पोस्टे नागपुरीगेट अमरावती | अब्दुल जमील अब्दुल बशीर रा. जुनी वस्ती अलमास गेट रोड बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नमुद घ.ता.वेळईव ठिकाणी फ्रुट दुकानामधे कॉटन मार्केट भाजी मंडी येथे बसले असता यातील आरोपी नामे अब्दुल जमील अब्दुल बशीर हा फिर्यादीचा लहान भाउ असुन तो फिर्यादीचे दुकानात आला व तुने पिताजी को क्यु गाव को भेजा या कारणावरुन त्याने त्याचेजवळील असलेल्या लाकडी काठीने फिर्यादीचे डोक्यावर, पायावर, व हातावर मारुन गंभीर जखमी केले तसेच त्याच्या खिश्यामधे असलेला चाकु काढुन फिर्यादीस धमकविण्याचा प्रयत्न केला व मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे बयान पोस्टे गाडगेनगर येथुन आज रोजी पोस्टे ला प्राप्त झाल्यावरुन तसेच बेस्ट हॉस्पीटल येथील मेडीकल सर्टिफीकेट प्राप्त झाल्यावरुन सदरचा गुन्हा दाखल. |

➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | बडनेरा, अप.नं. २८०/२३ कलम ३७९ भा.दं.वि. | फिर्यादीचे घराच्या मोकळ्या जागेतुन हरिदासपेठ , बसस्टँड समोर नवी वस्ती बडनेरा. | घटना ता. वे - दि. ११.०४.२३ चे २३.०० वा. ते १२/०४/२३ चे ०३/०० वा.<br>माहीती वेळ - दि १७.०४.२३ चे १३.०० वा.<br>दाखल ता. वेळ - दि. १७.०४.२३ चे १३.४० वा. | मोहन सुखदेवराव मेश्राम वय ३३ वर्ष रा. हरिदासपेठ , बसस्टँड समोर नवी वस्ती बडनेरा. | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी यांनी सन २००८ मध्ये सप्लेंडर प्लस कपनीची ब्लँक व निळा पट्टा असलेली मो. सा. क्र. एम.एच.२७ ए डी- ९७०५ ही गाडी दैनदिनी कामाकरिता घेतली होती. सदर गाडी फि. चे मोकळ्या जागेत उभी करुन ठेवली असती रात्री ११/०० वा जेवन् करुन कुटुबासह झोपलो असता रात्री दरम्यान दि. १२/०४/२०२३ चे सकाळी ०३/०० वा झोपेतुन उठले असता सप्लेडर प्लस ठेवलेल्या जागेत दिसुन आली नाही. शोध घेतला असता मिळुन आली नाही . सदर गाडी ही कोणीतरी खोडसाळपणे नेली असावी . व ती घरी परत आणुन देतील असे मला वाटले परतु कोणी आज पोवेतो आनुन् दिली नाही मी शोध घेतला मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने घकाच्या मोकळ्या जागेत उभा केलेली माझी सप्लेडर प्लस कपनीची ब्लँक व निळा पट्टा असलेली मो. सा. क्र. एम.एच.२७ ए डी- ९७०५ कि. अ. १५०००/ रु. चोरुन मेल्याची माझी खात्री झाल्याने पुढील कार्यवाही होणेकरिता रिपोर्ट देत आहे अश्या फि. चे जबीनी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ५२७/२३ कलम ३७९ भादवि | अंबा अपार्टमेंट चक्रपाणी कोलनी अमरावती | दि १ ५-०४-२३ चे ०१.०० ते ०१.३० वा दरम्यान<br>दि १७-०४-२३ चे ०२.३६ वा | संजय विश्वनाथ धंदर वय ५१ वर्ष रा अंबा अपार्टमेंट चक्रपाणी कोलनी अमरावती | दोन तीन अज्ञात इसम | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे गाडीचे डिक्की मधुन अज्ञात दोन ते तीन चोरांनी फि चे टिव्हीएस आय क्यु मोपेड क्र एम एच २७ डी के ८२०२ चे डिक्की मधुन आधार कार्ड ,पॅन कार्ड, नगदी २००० रु ,कॅशीओ कंपनीची हाताची घड्याळ कि अं १००० रु व जुना वापरता चष्मा कि अं १५०० रु असा एकुण ४५०० रु चा माल चोरुन नेला. अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ५२८/२३ कलम ३८०,३४ भादवि | सिदधार्थ नगर रामपुरी कॅम्प अमरावती | दि १७-०४-२३ चे ०२.३० वा दरम्यान<br>दि १७-०४-२३ चे ०९.३६ वा | दिगांबर दौलतराव मोहोड वय ७४ वर्ष रा सिदधार्थ नगर अमरावती | श्रीवेद राहुल मोहोड वय १९ वर्ष रा अमरावती अधिक अनोळखी इसम | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा आ क्र १ हा सख्खा नातु असुन एकाच घरात राहतात यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीला पिण्याकरिता पाणी आणण्यास सांगितले .फिर्यादी पाणी आणण्याकरिता घराचे आत गेले असता आ क्र १ याने घरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पितळी मुर्ती कि अं ६००० रु ची नगदी १५०० रु असा एकुण ७५०० रु चा मुददेमाल आरोपी क्र २ याचे जवळ दिला सदर मुददेमाल घेवुन आरोपी क्र २ हा फरार झाला वरुन फिर्यादी यांना आ क्र १ याला मुलाचे मदतीने पकडुन पो स्टे ला घेवुन आले.अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नांदगावपेठ<br>अप क्र १४४/२०२३<br>कलम २७९,५०४,५०६,३२३<br>भादवी | रहाटगाव चौक रोडवर | दि.१७/०४/२०२३चे ११/३०वा.<br>दा.ता.वेळ १७/०४/२०२३ चे १४/२७वा. | एक महिला | १) ट्रक क्र एम.एच.२७एक्स ६१९० चा चालक<br><br>२)निलेश वानखडे रा.श्रीहरी नगर नं.२ अमरावती<br><br>३) २ अज्ञात इसम | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटणा ता वेळी व ठिकाणी यातील फि हे त्यांचे फोरव्हीलर वाहण क्र एम.एच.२८ बि.के.४८६९ व्हेनुवा कार ने रहाटगाव चौक येथून फि चा मुलगा तसेच आणखी दोघेजण असे अर्जुन नगर येथे दुध डेअरी व जात असता यातील नमुद आरोपी चालकाने त्याचे गिट्टी चे ट्रक क्र एम.एच.२७एक्स ६१९० चे चालकाने त्याचे वाहण भरधाव वेगाने चालुन कारला मागुन ठोस मारली त्यामुळे फि चे कारचे हेड लाईट तुटला व नुकसान झाले तसेच आरोपी क्र २) याने फि ला शिविगाळ केली व मारहान केली वाद केला_ अशा फि यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर<br><br>अप क्र २८३/२०२३ कलम ४,२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ म पो का | राणा कॉम्प्लेक्स काँग्रेस नगर रोड अमरावती | दि.१६/०४/२०२३ चे २२.३० वा.<br><br>दि.१७/०४/२०२३ चे ००.३२ वा. | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास ब नं १०१५, पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | शुभम दिलीपराव बद्रे वय २६ वर्ष रा निळकंठ चौक बुधवारा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फि हे पो स्टे हद्दीत चपराशीपुरा सुंदरलाल चौक येथे पेट्रोलींग ड्युटीवर असताना एका गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाल्यावरुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी जावुन पाहिले असता आरोपी हा आपले हातामध्ये उघडे धारदार शस्त्र घेवुन येणा-या जाणा-या तसेच परिसरातील लोकांना जोरजोराने आरडा ओरडा करीत दहशत निर्माण करताना मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी पात्याचा धारदार चाकु असलेला किं अं २००/-रु चा जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला तसेच त्याने मा पालीस उपायुक्त सा. यांचे कलम ३७ (१)(३) म पो का जारी आदेशाचे उल्लंघन करुन हातामध्ये धारदार शस्त्र घेवुन लोकांमध्ये दहशत निर्माण केल्याने त्याचे हे कृत्य कलम कलम ४,२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ म पो का अन्वये होत असल्याने फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | नांदगावपेठ<br>अप क्र १४३/२०२३ कलम १४३,१४९,३४१ भादवी सहकलम कलम १३५ मपोका | रहाटगाव बस स्टॅन्ड जवळ रोडवर अमरावती | दि.१६/०४/२०२३ चे २० /०० वा. ते २०/१५ वा.<br>दि.१६/०४/२०२३ ते ०१/०५ वा. | संजय देऊळकर नापोका ब न १२४२ पोस्टे नांदगावपेट | १) निलेश गुहे वय ३० वर्ष रा.वडाळी अमरावती<br>२) अनिकेत ढेंगळे वय २५ वर्ष रा.अमरावती<br>३) वैभव देशमुख वय २८ वर्ष<br>४) सागर यादव वय २९ वर्ष<br>५) पंकज मांडळे वय २७ वर्ष<br>६) संकेत कुलट वय ३१ वर्ष<br>७) निखील बिजवे वय २८ वर्ष<br>८) संकेत साहु वय २५ वर्ष<br>९) अमोल राऊत वय ३१ वर्ष सर्व रा.अमरावती | हकीकत अशा प्रकारे ओह की , मी नापोका संजय देऊळकर ब न १२४२ पोस्टे नांदगावपेट येथे सन २०२० पासुन नेमुणुस आहे.मी सध्या पो स्टे .नांदगावपेठ येथे खुपीया विभागात कर्तव्य बजावीत आहे.आज दि.१६/०४/२०२३ रोजीा मा.श्री.चंद्रशेखर बावनकुळे भाजपा अध्यक्ष म.रा.यांचा अम.शहर येथे नियोजित दौरा कार्यक्रम होता.त्या अणुषंगाने मी व सोबत डे ऑफिसर पो.उपनी गजानन लोकडे ,पोहेका ६१९ असे रहाटगाव चौकात हजर होतो.मा.चंद्रशेखर बावनकुळे हे त्यांचे वाहनाचे ताफ्यासह नागपुर कडुन अमरावती कडे येत असतांना रहाटगाव बस स्टँड जवळ रात्री २०/०० वा ते २०/१५ वा.दरम्यान काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी<br>१) निलेश गुहे वय ३० वर्ष रा.वडाळी अमरावती २) अनिकेत ढेंगळे वय २५ वर्ष रा.अमरावती<br>३) वैभव देशमुख वय २८ वर्ष ४) सागर यादव वय २९ वर्ष ५) पंकज मांडळे वय २७ वर्ष<br>६) संकेत कुलट वय ३१ वर्ष ७) निखील बिजवे वय २८ वर्ष ८) संकेत साहु वय २५ वर्ष<br>९) अमोल राऊत वय ३१ वर्ष सर्व रा.अमरावती<br>यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन अचानक रहाटगाव चौकात रत्यावर येवुन मा.चंद्रशेखर बावनकुळे हे त्यांचे वाहनात बसुन रत्यावरुन जात असतांना वरील इसमानी त्यांच्या वाहनाचा जाण्याचा रस्ता अडविला व बावनकुळे गो बँक ,राहुलजी जिंदाबाद असे नारे देऊन काळे झेडे आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन जाण्या येण्याच्या रत्यात अडथळा निर्माण करुन .मा.पो .आयुक्त अम.शहर यांचे कलम ३७ (१)(३) मपोका आदेशाचे उल्लघन केले.आरोपीतांचे सदर चे कृत्य कलम १४३/२०२३ कलम १४३,१४९,३४१ भादवी सहकलम कलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा होत असल्याचे त्यांचे विरुद्ध गुन्हा नोद होण्यास माझी कायदेशीर फिर्याद आहे.अशा फि च्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल . |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ५२६/२३ कलम १९५(अ),५०६(ब),३४ भादवि सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट | नवयुवक मंडळ विलास नगर गल्ली चौक अमरावती | दि १६-०४-२३ चे २०.०० वा दरम्यान<br>दि १७-०४-२३ चे ०१.५२ वा | रोषन भिमराव दुर्गे वय ४७ वर्ष रा विलास नगर अमरावती | सुरज वासनिक अधिक तीन इसम रा विलास नगर अमरावती | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि हा त्यांचा मित्र विशाल सोबत नमुद वेळी माटर सायकल ने जात असतांना यातील आरोपी याने त्याचे विरुदध कलम ३०७ भादवि मध्ये दोन वर्ष आधी कोर्टात साक्ष दिली ह्याकारणावरुन थांबा असे म्हणुन हातात चाकु घेवुन मागे धावले त्यावेळी फिर्यादी व त्याचा मित्र घाबरले व तेथु पळाले.अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | पो.स्टे. खोलापुरीगेट अप.क्र. ७१/२०२३ कलम ४२०, ४६५, ४६८,४७१, ३४ भादवि सहकलम १२अ महा. जुगार अधिनियम | राहुल नगरे यांचे घरासमोर मच्छीसाथ अमरावती | घटना ता. वेळ १६/०४/२०२३ चे १८.१० वा ते २०.१५ वा. दाखल ता. वेळ १७/०४/२०२३ चे ००.५४ वा. | सर.तर्फे पोउपनि. गजानन राजमल्लु नेमणुक विशेष पथक अमरावती शहर | १. राहुल उर्फ सनी राजेश नगरे वय २९ वर्ष रा. मच्छीसाथ अमरावती<br>२. आरोपी नामे आशिष गुप्ता रा. मसानगंज अमरावती | हकीकत— अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती वरून मच्छीसाथ येथे सन राजेश नगरे हा त्याच्या घराबाहेर मुंबई इंडीयन्स व कलकत्ता रायडर्स या क्रिकेट आयपीएल सामण्यावर मोबाईल फोन चे सहायाने लोकांना लिंक देवून बेटींग देून सटटा जुगार खेळ पैशाची बाजी लावून हारजितचा खेळ खेळवित आहे वरून प्रापत माहिती नुसार जावून रेड केली असता नमुद आरोपी नमुद क्रिकेट सामन्यावर मोबाईल मधील गुगल क्रोम मध्ये जीओ ९९९ एक्सचेज यानावाचे गैरकायदेशीर सॉप्टवेअर बनवुन लोकांना खरे आहे असे भासवून त्यामध्ये चालु असलेल्या क्रिकेट मॅच चे भावावर फोनचे सहायाने बेटींग करतांना मिळूनआले. त्यांचे ताब्यातुन चार मोबाईल, रजिस्टर किंमत अंदाजे ५० रू. असा एकुण ३३०५० रू. चा माल जप्त करण्यात आला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ५. | पो.स्टे. भातकूली अपनं. 82/2023 कलम 294,323, 504,506, भा.द.वी सहकलम (3)(1)(R) (S) (3)(2)(5a)अनु जाती जमा अधि 1989 प्रमाणे | पो.स्टे. भातकूली हद्दीत | . 16/04/2023 चे 22/00 वा दरम्याण भातकूली गुन्हा दाखल ता वेळ दि 17/04/2023 चे 01/44 वा | एक महिला | प्रशांत गंगाधर पडोळे वय 30 वर्ष रा ग्राम हरताळा ता.भातकूली जि अमरावती | .हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हि दि 16/04/2023 रोजीचे 22/00 वा तिचे घरासमोर तिची भावजय हिचे सोबत घरगुती गप्पा गोष्ठी करीत असतांना यातील आरोपी हा त्याच्या घरा कडुन आला व फिर्यादीस पाहुन जातीवाचक शिवीगाळ केली, त्यावर फिर्यादीने म्हटले की तु समाजावर का शिव्या देतो तर तो पुन्हा सर्व समाजावर शिवीगाळ करून बोलला. भाडनाचा आवाजाने मोहल्यातील महीला, मुले मानसे जमा झाले .फिचा मुलगा हा आरोपीस समजावत असतांना आरोपीने फिर्यादीच्या मुलास लाथाभुक्याने मारहान केली त्याच्या उजव्या डोळयावर मार लागला तसेच फिर्यादीचे केस ओढले तसेच समाजावर शिव्या देत घरी गेला व पुन्हा त्याची मोटार सायकल घेवुन आला व गाडी फिर्यादीचे मुलाच्या अंगावर घेवुन आला तेव्हा मोहल्यातील लोक जमा झाले त्याना सर्वाना पाहुन उद्देशुन जातीवाचक शिवीगाळ केली तेव्हा शेजारी लोकांनी त्याला त्याचे घराकडे घेवुन गेले अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती मर्ग क्र ०९/२३ कलम १७४ जाफो | इमाम नगर फि .चे राहते घर अमरावती | नाजीम शाह आमद शाह वय ७० वर्ष रा इमाम नगर अमरावती | नबी शाह नाजीम शाह वय ४०वर्ष रा इमाम नगर अमरावती | गळफास घेवुन | आम्ही पोउपनि विधाते दि १६/४/२०२३ रोजी २१/०० ना तो दि .१७/०४/२०२३ पर्यंत पो.स्टे नागपुरीगेट येथे नाईट डी ओ ड्युटी असता फिर्यादी नामे नबी शाह नाजीम शाह वय ४०वर्ष रा इमाम नगर अमरावती यांनी फोन द्वारे माहीती दिली की, त्यांचे वडील मृतक नामे नाजीम शाह आमद शाह वय ७० वर्ष रा इमाम नगर अमरावती यांनी त्यांचे राहते घरी हरनियाचे त्रासा मुळे कंटाळुन व-हाड्या मध्ये स्लॅाप ला सुती दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली आहे अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून पो.स्टेला मर्ग क्र ०९/२३कलम १७४ जाफो प्रमाने दाखल. |
| २ | पोस्टे राजापेठ मर्ग क्र. ३७/२३ कलम १७४ जा.फौ. | नंदा मार्केट अमरावती | दिलीप नारणराव कांबडे वय- ५० रा इ नंदा मार्केट अमरावती | नापोशि शैलेंद्र ब नं १३७१ पोस्टे राजापेठ | उपचारा दरम्यान मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आहे की आज दिनांक १६.०४.२०२३ चे २१.०० वा ते ०८.०० वा पावेतो तपास मदत ड्युटी सुरी असतांना पंजाबराव दवाखाना येथुन मरणाचा मेमो क्र. १६५२/२३ मृतक नामे दिलीप नारणराव कांबडे वय- ५० रा - नंदा मार्केट अमरावती पोस्टेला प्राप्त झाल्या वरुन त्यांचा मुलगा यांचे बयाण घेतले समक्ष विचारल्या वरुन सांगीतले की, नमुद पत्यावर राहतो दि. १२/०४/२३ रोजी सायंकाळी १९/०० वा. घरी लहान मुले खेळत होते त्यावेळी माझे वडील नामे दिलीप नारणराव कांबडे हे खाली फर्शीवर झोपले होते खेळता खेळता लहान मुलाने स्टुलवर ठेवलेल्या टी.व्ही. चा वायर खेचल्याने टी.व्ही. खाली झोपलेले वडीलांच्या पोटावर पडली त्यांना मुक्त मार लागला दि. १३/०४/२३ रोजी त्यांच्या पोटात जास्त त्रास होत असल्यामुळे पंजाबराव दवाखाना येथे उपचारा करीता नेले व सीटी स्कॅन केल्यावर समजले की, त्यांच्या पोटात इंटर ब्लडींग झाले आहे त्यामुळे त्यांचा दि. १४/०४/२३ रोजी रात्री ०१/०० वा. शस्त्रक्रीया करण्यात आली दि. १६/०४/२३ रोजी प्रकृती फारच खराब झाली त्यांचा दि. १६/०४/२३ रोजी २०/०० वा. मृत्यु झाल्याने डॉ. सा. यांनी सांगीतले, आम्हाला कोणतीही तक्रार द्यायची नाही वरुन सदरचा मर्ग दाखल. |
| ३ | पोस्टे सिटी कोतवाल मर्ग क्र. १५/२०२३ कलम १७४ जा.फौ. | साबनपुरा पोलीस चौकीजवळ परकोटच्या भिंतीला लागुन अमरावती | अनोळखी ईसम वय अंदाजे ४८ वर्ष | सरतर्फे पोहेकॉ रविंद्र हरणे ब.नं १०२४ पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | ब्रॉथ डेड | हकीकत अशा प्रकारे आहे की, आम्ही पोहेकॉ १०२४ पोकॉ ३७२ असे पोस्टे ला तपास मदत ड्युटी असतांना वायरलेसद्वारा कंट्रोलने माहीती दिली की, एक अनोळखी पडलेल्या अवस्थेत साबनपुरा चौकीजवळ ईसमास अँम्बुलन्स मध्ये घेवुन ईर्विन दवाखाना येथे घेवुन जावुन ईर्विन दवाखआना येथील वैद्यकीय अधिकारी यांनी तपासुन ब्रॉथ डेथ चा मेमो क्र. ४७४७ दिल्याने सदरचे प्रेत हे नातेवाईकांचा शोध घ्यायचा असल्याने ईर्विन मर्च्युरी येथे ठेवण्यात आलेले आहे तरी ईर्विन येथील मेमो क्र. ४७४७ वरुन डि ओ सा यांच्या आदेशाने सदरच्या मेमोवरुन मर्ग दाखल करुन तपासात घेतला तसेच मरणाचे कारण निश्चित होणेकरीता अनोळखी ईसमाचे प्रेत पि.एम करण्याकरीता ईर्विन मर्च्युरीत ठेवण्यात आला |
| ४ | पो स्टे गाडगे नगर मर्ग क्र २३/२३ कलम १७४ जाफौ | मा सत्र न्यायाधिश बंगला सुरक्षा पिकेट अमरावती | संजय रामदास वरखडे वय ५३ वर्ष रा सुरक्षा कॉलनी अमरावती | रामेश्वर शामरावजी टाकडे वय ५३ वर्ष रा पो मु अमरावती शहर | ब्रॉथ डेथ | याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यांतील फिर्यादी सोबत नापोका ११७८ नितिन व सपोउपनि संजय वरखडे (मृतक) ब ने १४०४ यांची दि. १६.०४.२३ चे २२.०० ते दि.१७.०४.२३ चे ०१.०० वा पर्यत गार्ड ड्युटी सुरु असतांना फि ड्युटी करुन गार्ड रुम मधईल पलंगावर बसले आणि ०१.०० वा पासुन नापोका नितीन ११७८ हे गार्ड रुन बाहेर पाहरा देत होते आणि सपोउपनि संजय ब नं १४०४ हे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | घ ता वेळ दि<br>दि.१७.०४.२३ चे<br>०२.२० वा ब<br><br>दा ता वेळ<br>दि.१७.०४.२३ चे<br>०९.०१ वा | | | | फि चे बाजुला आराम करित होते तर अंदाजे ०१.५० वा चे सुमारास संजय यांनी झोपेतच करकस आवाज काढुन उठुन बसायचा प्रयत्न केला तर ते पलंगाचे खाली पडले तर फि ने पकडण्याचा पर्यत केला व नितीन यांना आवाज दिला .आम्ही दोघांनी त्यांना सरळ केले त्याचे सोबत बेलल्लो असता त्यांचा काहीही प्रतिसाद नव्हता त्याची पर्कृती पाहुन तात्काळ कंट्रोल ला माहीती देवुन उपचारा करिता घेवुन गेले वरुन पो स्टे ला रिपोर्ट दिला तसेच सामान्य रुग्णालय ममो कत्र ४७४९ चा पो कॉ राजेंद्र व्यवहारे ब नं १५२४ चा प्राप्त झाला असुन मृतक संजय रामदास वरखडे वय ५३ वर्ष रा सुरक्षाकॉलनी तपावन गेटयांचा दि.१७.०४.२३ चे ०२.२० वा ब्रॉथ डेथ चा मेमो प्राप्त झाल्याने सजरचा मर्ग नोद. |

प्रोव्हीशन

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | फ्रेजरपुरा | अप क्र. २८४/२०२३ कलम ६५(ई) मदाका | गजानन नगर बिच्छु टेकडी अमरावती | दि.१७/०४/२०२३ चे ११.४० वा. | दि.१७/०४/२०२३ चे १३.२६ वा. | सरतर्फे पोहेकॉ सुनिल सोळंके ब नं २८९, पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | करण दिपक खोडके वय २५ वर्ष रा. गजानन नगर बिच्छु टेकडी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पेट्रोलींग ड्युटीवर असताना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, गजानन नगर बिच्छु टेकडी येथे एक इसम घरासमोर अवैध रित्या दारु विक्री करत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरुन सदर ठिकाणी प्रोव्ही रेड केली असता आरोपी हा पैसे घेवुन दारु विक्री करताना मिळुन आला. सदर आरोपीस पंचासमक्ष ताब्यात घेतले असता त्याचे ताब्यातुन देशी दारु संत्रा बॉबी १८० मीली च्या ११ पावट्या ६० रु प्रमाणे एकुण किं अं ६६०/- रु चा प्रोव्ही मुद्देमाल पंचासमक्ष जप्ती पंचनामाप्रमाणे जप्त केला असुन फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरा गुन्हा दाखल |